सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**
**(ग्राम पंचायत विभाग)**
ग्रा.पं. विभाग, जि.प. गडचिरोली तळ मजला, खोली क्र. 19, जिल्हा पेसा कक्ष, मुल रोड, कॉम्पलेक्स गडचिरोली 442605
दुरध्वनी क्र. 07132-222308 ईमेल- dceopanchayatgadchiroli@gmail.com
pesacellzpgadchiroli@gmail.com

| जा.क्र./जिपग/जि.पेसा कक्ष/378/2026-27 | दिनांक :03 जुलै, 2026 |
|---|---|

<u>**अत्यंत महत्वाचे/तात्काळ**</u> :-

**प्रति,**

**गट विकास अधिकारी**
पंचायत समिती, अहेरी, आरमोरी, भामरागड,
चामोर्शी, देसाईगंज, धानोरा, एटापल्ली, गडचिरोली,
कोरची, कुरखेडा, मुलचेरा व सिरोंचा.

**विषय :** **अनुसूचित क्षेत्रातील लहान जलस्त्रोतांच्या लिलाव प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सुचना...**

**संदर्भ :**
1. पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, 1996
2. या कार्यालयाकडील आदेश क्र./जिपग/सि/पेसा/आरे/1995/2013 (सिंचाई विभाग), दिनांक 12 डिसेंबर, 2013
3. ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :संकिर्ण -2014/प्र.क्र.194/पंरा-2, दिनांक 02.08.2014
4. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:मत्स्यवि 2014/प्र.क्र.35/पदुम 13, दिनांक 20 ऑक्टोंबर, 2014
5. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:मत्स्यवि 2014/प्र.क्र.35/पदुम 13, दिनांक 12 सप्टेंबर, 2014
6. ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक : झेडपीए 2019/प्र.क्र.57/पंरा-1, दिनांक 30 डिसेंबर, 2020

****

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये कळविण्यात येते की, **"पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, 1996"** (पेसा कायदा) चे कलम 4 (त्र) नुसार "अनुसूचित क्षेत्रातील लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन करण्याचे काम समुचित पातळीवरील पंचायतींकडे सोपविण्यात येईल" अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**"महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत) नियम,** 2014 चे नियम 28, 29 व 30 मध्ये लघु जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापनाबाबत तरतूदी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. उक्त तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन समुचित स्तरावरील पंचायतीकडून करण्यात येत आहे.

अनुसूचित क्षेत्रातील 100 हेक्टर खालील लहान तलावांचे मत्स्यव्यवसाय हक्क संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरित करण्यात आले असून, सदर तलावांचे व्यवस्थापन, संवर्धन, ठेका/लिलाव व

उत्पन्नाचा विनियोग ग्रामसभा मान्यतेनुसार करण्याबाबत वरील शासन निर्णय निर्गमित आहेत. सदर बाबींची प्रभावी अंमलबजावणी व नियमबाह्य कार्यवाही टाळण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

1. पंचायत समिती स्तरावर अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व लहान तलावांची अद्यावत माहिती तयार करून ठेवावी.
2. ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या मान्यतेनुसार सदर तलावांचे हक्क मासेमारी करिता स्वत:कडे ठेवावेत किंवा जाहीर लिलाव पध्दतीने देण्यात यावेत.
3. ग्रामपंचायतीच्या हद्दीतील स्थानिक पारंपारिक मच्छीमार यांचे हक्क ग्रामसभेमध्ये ठराव घेऊन अबाधित ठेवण्यात यावेत, व त्यांना मासिक परवाना देऊन मासेमारी करण्यास मुभा देण्यात यावी, त्यांनी पकडलेली मासळी तलाव ठेकेदारांना विक्री करण्यात यावी.
4. मासेविक्रीतुन / तलाव ठेक्यातुन मिळणारी रक्कम / मासेमारी परवाना देण्यातुन मिळणारी रक्कम इत्यादी ग्रामपंचायतीने याबाबतचा लेखाजोखा ठेऊन ग्रामनिधीमध्ये ठेवण्यात यावा.
5. शासकिय योजनेतुन मत्सव्यवसाया करिता आलेले अनुदान ग्रामनिधीमध्ये ठेवुन त्याचे लेखेजोखे स्वतंत्र ठेवण्यात यावेत. वरिल सर्व व्यवहार ग्रामसभेची मान्यता घेऊन करणे आवश्यक राहील.
6. तलाव ठेका देणे व मासे संवर्धन करण्या संदर्भात तांत्रिक सहाय्य मिळण्यासाठी ग्रामपंचायतींना मत्स्यव्यवसाय विभागाकडे मागणी करण्याचे अधिकार राहतील, मासेमारीच्या वेळी दिर्घकालीन मत्स्यसंवर्धनाचे निकष पाळण्यात यावेत. व त्याची जबाबदारी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची राहील.
7. जेव्हा एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत हद्दीमध्ये तलाव येत असेल अशा वेळी सदर तलाव ठेक्याने देण्याची कार्यवाही पंचायत समितीने करावी. तथापी संबंधित तलाव ठेक्याची निव्वळ उत्पन्नाचा 50% वाटा हा संबंधित ग्रामपंचायतीमध्ये समप्रमाणात वाटप करण्यात यावा. व उर्वरीत 50% वाटा पंचायत समितीस त्यांच्या मोबदला देण्यात यावा. यामोबदल्यातुन पंचायत समितीने यासंबंधित तलावाचे देखभाल व दुरुस्तीची कामे करुन द्यावी.
8. तलाव ठेका मासेमारी वर्ष 01 जुलै ते 30 जुन असे राहील, तलाव ठेका कालावधी मुदत 5 वर्ष राहील.
9. संबंधित तलाव मत्स्यव्यवसायासाठी वापरण्यापूर्वी ग्रामसभेची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक राहील.
10. ग्रामपंचायतीने लिलाव प्रक्रिया पारदर्शक व सार्वजनिक पद्धतीने ग्रामसभा ठरावानुसार राबवावी. लिलाव सूचना सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करावी.
11. तलाव ठेका रक्कम निश्चित करताना शासन निर्णयानुसार किमान राखीव दर निश्चित करावा. त्यापेक्षा जास्त रक्कम ग्रामसभा ठरावाद्वारे निश्चित करता येईल.
12. ग्रामपंचायतीने तलावातून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाची विभागणी ग्रामसभेच्या मान्यतेनुसार करावी व त्याचा वापर तलाव संवर्धन व ग्रामविकासासाठी करावा.
13. योजना राबविताना केंद्र शासनाच्या मूळ तत्त्वांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
14. योजनांचा लाभ अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी व्यक्ती, मच्छीमार संस्था व स्थानिक लाभार्थ्यांना प्राधान्याने द्यावा.
15. ग्रामपंचायतीने लघु-जलाशय लिलाव ग्रामसभा ठराव, लिलाव नोंदी, आर्थिक व्यवहार व अभिलेख स्वरूपात जतन करावीत व तपासणीवेळी उपलब्ध करून द्यावीत.
16. गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत अधिकारी यांचे नियमित आढावा सभा घेऊन लघु-जलाशयाचे लिलाव / व्यवस्थापन बाबत मासिक प्रगती अहवाल जिल्हा पेसा कक्ष (पंचायत विभाग), जिल्हा परिषद, गडचिरोली यांना नियमित सादर करावेत.

17. वरील सूचनांचे पालन न केल्यास अथवा कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

वरील सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करून अनुसूचित क्षेत्रातील सर्व पेसा ग्रामपंचायतींना याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

(सुहास गाडे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**प्रतिलिपी :-**

1. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
2. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
3. संचालक, राज्य पेसा, राज्य पेसा कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस सादर.
4. अपर आयुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर यांना माहितीस सादर.
5. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) तथा नोडल अधिकारी (पेसा), जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
6. सहाय्यक आयुक्त मत्सव्यवसाय (तांत्रिक), गडचिरोली यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
7. जिल्हा जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
8. नस्ती- जिल्हा पेसा कक्ष (पंचायत विभाग) जि.प. गडचिरोली.

(सुहास गाडे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**